**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

| | |
|---|---|
| ग्राहक तक्रार क्र. २२/२०१५ | दि. १५.१२.२०१५ |
| ग्राहक तक्रार क्र. २३/२०१५ | दि. १५.१२.२०१५ |

| | |
|---|---|
| श्री श्री मन्सुर युसुफ काझी<br>रा. साईनगर,कोदवली<br>ता.राजापूर /जि. रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, महावितरण<br>विभागीय कार्यालय रत्नागिरी | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. वि. रा. कांबळे,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>२) श्री. ज. पु. बिवलकर<br>सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | १) श्री. मन्सूर युसुफ काझी |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री. व्ही. व्ही.मामीलवाड<br>कार्यकारी अभियंता,<br>विभागीय कार्यालय, रत्नागिरी<br>२ श्री. अजित अस्वले<br>अतिरिक्त कार्यकारी अभियंता,<br>विभागीय कार्यालय,रत्नागिरी<br>३) श्री. अनिलकुमार मुलचंद डोंगरे<br>उपकार्यकारी अभियंता राजापूर-१ |

**महाराष्ट्र वीज नियामक आयोग, [ ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) ] विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

१) तक्रारदार ग्राहक श्री मन्सुर युसुफ काझी, रा.साईनगर,कोदवली, ता.राजापूर,जि. रत्नागिरी यांनी गांव दत्तवाडी येथील स.नं. २९ हि.नं. ३ व स.न. ३४ हि.नं. ५ हया त्याचे स्वसंपादित मालकी हक्क व कब्जा वहिवाटीमध्ये ५-५ हॉ.पांवर्स वीजजोडभारासाठी दोन स्वतंत्र वीज कनेक्शनसाठी महावितरण राजापूर-१ येथे दि.२०.०५.२०११ रोजी मागणी केली आहे. त्यासाठी लागणारे चलन त्यांनी रु.५२४०/- दि. २१.०९.२०११ व त्यांचा ग्राहक क्र. २१३६२०००५२३५ व रु. ५२४०/- दि.२१.०९.२०११ व ग्राहक क्र. २१३६२०००५२२७ अनुक्रमे असा आहे. त्यांनी स.क्र. २९/३ मध्ये ३ वर्षापुर्वी ५२५ कलमे व स.क्र. ३४/५ मध्ये ६९० हापूस आंब्याची कलमे लावलेली आहेत. त्यासाठी त्यांनी त्याचे जमीनीमध्ये विहीरी, सबमर्शिबल पंप्स संपूर्ण बागेमध्ये ड्रिप ड्रिगेशन चीही व्यवस्था केली आहे. त्यासाठी साधारणतः प्रत्येकी ९ लाख ८० रुपये खर्च केला आहे. पाण्याअभावी कलमांचे नुकसान होत आहे. शेतीपंपाचे नवीन कनेक्शनची नितांत गरज आहे व ती लवकरात लवकर मिळावीत व नुकसानीपोटी प्रत्येकी रु. २ लाख रुपये दयावेत असे तक्रारीत म्हटले आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या दि.०४.०२.२०१३ च्या आदेशाने समाधान न झाल्याने प्रस्तुत तक्रार दाखल केली आहे व त्यानुसार त्यांनी 'अ' नमुन्यात दि. १५.१२.२०१५ रोजी दोन स्वतंत्र अपील मंचात दाखल केले आहेत. त्यांचा केस क्र.२२ व २३ असा आहे. तक्रारदार, तक्रारीचा विषय, प्रतिवादी व दोन्ही बाजूंचे युक्तिवाद एकसारखेच असल्याने तक्रार एकत्रित करुन निर्णय दिला आहे.

२) सदर तक्रार क्र.२२ व २३ दि.१५.१२.२०१५ साठी लेखी खुलासा या कार्यालयाचे पत्र क्र. १६१ व १६२ दि.१६.१२.२०१५ नुसार कार्यकारी अभियंता रत्नागिरी यांचेकडुन मागविण्यात आला. व त्यांनी त्यांचा लेखी खुलासा त्यांचे पत्र क्र.३४३ व पत्र क्र.३४४ दि.१३.०१.२०१६ रोजी सुनावणी दरम्यान दिला. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र. ०५ दि.०६.०१.२०१६ रोजी उभयपक्षांना कळवून दि.१३.०१.२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. सुनावणीची तारीख निश्चित केली व त्यानुसार दि.१३.०१.२०१६ रोजी सुनावणी घेणेत आली.

३) (क) दि. १३.०१.२०१६ रोजी दुपारी १२.०० सुनावणी दरम्यान ग्राहक श्री. मन्सुर युसुफ काझी, रा.कोदवली स्वतः व महावितरणचे बाजूने श्री मामीलवाड कार्यकारी अभियंता रत्नागिरी, श्री अस्वले अतिरिक्त कार्यकारी अभियंता रत्नागिरी विभाग व श्री. डोंगरे उपकार्यकारी अभियंता राजापूर-१ उपविभाग उपस्थित राहिले.

(ख) ग्राहक श्री. काझी यांनी लेखी तक्रारीत सविस्तर म्हणणे दिले आहे. तेच कायम आहे असे कथन केले. व पुढे ते असे म्हणाले की त्यांनी कोटेशनप्रमाणे दोन्ही कनेक्शनसाठी रक्कमा जमा करुन पावत्या दाखवूनही प्रलंबित यादीमध्ये नांवे नाहीत व त्यामुळे आपण ग्राहकच नाही असे अपामानास्पद उत्तर महावितरणचे उपकार्यकारी अभियंता राजापूर-१ यांचेकडून मिळाले. ही बाब धक्कादायक आहे. त्यांचेकडे वीजपुरवठा करणेसाठी १/२ वर्षापुर्वी खांब आणून ठेवलेले आहेत. मात्र पुढे प्रगती नाही. कनेक्शनसाठीचे रोहित्राचे ही काम पुर्ण झालेचे समजते, कक्षाने टेस्ट रिपोर्ट घेऊन वीजपुरवठा सुरु करण्याचे कळविले. त्यानंतर १ महिन्यापुर्वीच टेस्ट रिपोर्ट दिला आहे. तरी त्वरीत वीजपुरवठा मिळावा ही मागणी ही केली. वीजपुरवठा त्वरीत मिळाल्यास भरपाईचा आग्रह

धरणार नाही असेही सांगितले. मार्च २०१६ पर्यंत दोन्ही जोडण्या न मिळाल्यास भरपाईचा आग्रह असेल असेही श्री काझी यांनी स्पष्ट केले. तसेच क्र.२२ व क्र.२३ साठी ग्राहकाचे म्हणणे

वरीलप्रमाणेच असून त्याचा विचार व्हावा अशी विनंती केली. कक्षाच्या आदेशानुसार वारंवार भेटल्यानंतर महावितरणचे अधिकारी यांनी वीजपुरवठा सुरु करणेचे त्या त्यावेळी आश्वासन दिल्याने मंचाकडे तक्रार केली नाही असा खुलासा केला.

(ग) महावितरणच्या तर्फे श्री. डोंगरे यांनी उपकार्यकारी अभियंता, रत्नागिरी यांचे लेखी म्हणणे वरील संदर्भिय पत्र क्र. ३४३ व ३४४ दि.१३.०१.२०१६ ने सादर केले. व पुढीलप्रमाणे कथन केले. ग्राहकाने दोन्ही कनेक्शनसाठीची प्रत्येकी रक्कम रु. ५२४०/- दि. २१.०९.२०११ रोजी जमा केलेली असून अद्याप वीजजोडण्या दिल्या नसल्याचे मान्य केले. ग्राहकांने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. ०२.११.२०१२ रोजी व दि.०४.१२.२०१२ रोजी तक्रार दाखल केली होती कक्षाचे दि.०४.०२.२०१३ चे आदेशानुसार ग्राहकाकडे पेपर नोटीस व्दारे टेस्ट रिपोर्टची मागणी केली परंतु अहवाल प्राप्त झाला नाही व तो टेस्ट रिपोर्ट अलीकडे महिन्या दोन महिन्यापुर्वी दिला आहे. आयोगाच्या मंचाविषयीच्या विनियमातील कलम ६.४ प्रमाणे कक्षाचे आदेशानंतर ६० दिवसात मंचाकडे अपील केले नाही. त्यामुळे ते मुदतबाहय आहे. मंचाने विनियम ६.४ दाखविल्यानंतर तशी तरतूदच नसल्याचे मान्य केले. नंतर विनियम ६.६ प्रमाणे तक्रार मुदतबाहय असल्याने फेटाळावी असे प्रतिपादन केले. ग्राहकाने टेस्ट रिपोर्ट (कपॅसिटर बसवून) दिला नाही. म्हणून पुरवठया विषयाच्या ५.९ प्रमाणे कनेक्शन देण्यात विलंब झाला असे प्रतिपादन केले. सदर विनियमात वितरण व्यवस्था पुर्ण करण्यासाठी टेस्ट रिपोर्टची अटच नाही हे मंचाने निर्दशनास आणल्यानंतर श्री. डोंगरे उत्तर देऊ शकले नाहीत.

ग्राहकाने मागणी केलेप्रमाणे वीज कायदा २००३ च्या कलम ५७ प्रमाणे कोणत्याही प्रकारच्या भरपाईसाठी पात्र नाहीत असे कथन केले.

४) ग्राहकाने दोन्ही कनेक्शनसाठी नमुद केलेप्रमाणे रक्कमा जमा केल्या असल्याने व सन २०११ पासून सदर अर्ज प्रलंबित असल्याने कोणतीही त्रुटी नाही म्हणून वीज पुरवठा केव्हा सुरु करु शकता अशी मंचानी विचारणा केली असता, मार्च २०१६ अखेर पर्यंत वीजपुरवठा सुरु करण्याचे श्री मामीलवाड कार्यकारी अभियंता, व अन्य अधिकाऱ्यानी आश्वासन दिले. ग्राहकाने त्यास मान्यता दिली व महावितरणचे अपेक्षेप्रमाणे याकामी सर्व सहकार्य करण्याचे ग्राहकांने आश्वासन दिले. तसेच ग्राहकाने सं.नं. २९/३ मधील जोडणीसाठी ४/५ खांब पुरेसे असून व संपूर्ण क्षेत्र त्यांचे मालकीचे असलेने कोणतीही हरकत उद्‌भवणार नाही त्यामुळे तेथे पुरवठा फेब्रुवारी २०१६ मध्ये दयावा व दुसरे अर्जाप्रमाणे सर्वे नं. ३४/५ येथील जोडणी मार्च २०१६ पूर्वी दयावी असे ग्राहकाने सुचविले व त्यास महावितरणचे अधिकारी यांनी मान्यता दिली.

५) उभयपक्षानी सादर केलेला लेखी खुलासा, कागदपत्रे व सुनावणी दरम्यान केलेला तोंडी, युक्तीवाद या नुसार मंच खालील अभिप्रायापर्यंत आले आहे.

(क) सदर केसमधील ग्राहकांने त्याचे वीजजोडणीसाठी दि. २०.०५.२०११ रोजी महावितरणकडे दोन अर्ज दाखल केलेले आहे व त्यांनी कोटेशनच्या रक्कमा दि.२१.०९.२०११ रोजी भरलेल्या आहेत. व कक्षाच्या आदेशाप्रमाणे वीजजोडणी साठी लागणारे (कपॅसिटर बसवून) चाचणी अहवालही सादर केलेले आहेत. तथापि आजमितीस म्हणजे डिसेंबर
२०१५ अखेर त्यांना वीजजोडणी महावितरणकडून दिली गेली नाही. ही वस्तुस्थिती खरी आहे व ती महावितरणचे अधिकारी यांनी मान्य केली आहे.

(ख) सदर कनेक्शनसाठी उच्चदाब वाहिनी '०' किमी लघुदाब वाहिनी १.१५ किमी व २५ केव्ही अे राहित्र -१ लागणार आहे. व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकाच्या कृतीमानके, विद्युतपुरवठा सुरु करण्याचा कालावधी आणि भरपाईची निश्चितीकरण), विनियमातील तरतुदीनुसार सदर कनेक्शन दि.२०.०५.२०११ पासून एक वर्षात म्हणजे २०.०५.२०१२ पर्यंत देणे महावितरण कंपनीस बंधनकारक होते. तथापि आजमितीस सदर कनेक्शनस् झालेली नाहीत ही वस्तुस्थिती खरी आहे.

(ग) सप्लाय कोड २००५ मधील कलम ४.४ नुसार वितरण कंपनीने शक्यतो जेष्ठता यादीनुसार ग्राहकाला वीजपुरवठा करावा असे सुचविले आहे. परंतु वितरण कंपनीकडे सन २०११ पासून डिसेंबर २०१५ पर्यंतच्या सर्वच वीज जोडण्या प्रलंबित आहेत. असे महावितरणचे अधिकारी यांचेकडून समजले शिवाय सदरचे प्रलंबित शेतीपंपाचे कामासाठी निविदा पूर्ण होऊन कंत्राटदारांची नेमणूकही झाली असून सदर कामे सुरु आहेत व मार्च २०१६ अखेर सर्व प्रलंबित काम करण्याचे महावितरणचे उद्दीष्ट आहे. व त्यासाठी सर्व प्रलंबित ग्राहकांना मार्च २०१६ अखेर वीजपुरवठा करण्या बाबतही "आश्वासन पत्रे" महावितरणकडून दिली आहेत असे सांगितले.

६) तसेच सुनावणी दरम्यान कार्यकारी अभियंता श्री. मामीलवाड व इतर अभियंता यांनी सदर ग्राहकाचे दोन कनेक्शन मधील सर्वे नं. २९/३ मधील कनेक्शन फेब्रुवारी २०१६ व सर्वे नं. ३४/५ मधील कनेक्शन मार्च २०१६ अखेर देणेचे मान्य केले आहे व त्यास ग्राहकानेही विनाअट संमत्ती दर्शविलेली आहे. व नुकसान भरपाईची मागणी केली नाही. परंतु सदर काम मार्च २०१६ अखेर झाले नाही तर ग्राहकाने नुकसान भरपाईची मागणी केली आहे व ग्राहकाचा अधिकार रहाणार आहे. तरी महावितरणने उचीत कार्यवाही दिलेल्या मुदतीत करणे गरजेचे आहे व तसे अपेक्षीत आहे.

७) तथापि सदर ग्राहकांने त्यांच्या तक्रारी मंचात दि.१५.१२.२०१५ रोजी दाखल केलेल्या आहेत. व ग्राहकाने तक्रारी, त्यांचे अर्जाचा दि.२०.०५.२०११ रोजीपासून किंवा अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने दिलेल्या दि.०४.०२.२०१३ रोजीचे आदेशापासून २ वर्षे दि.०४.०२.२०१५ पर्यंत देणे आवश्यक होते. तथापि ग्राहकाने कक्षाच्या आदेशानंतरही अवाजवी विलंबाने अपीले दाखल केलेली आहेत परंतु विलंबाबाबत कोणतीही लेखी व तोंडी संयुक्तिक कारणे दिलेली नाहीत. व विलंब माफीसाठी लेखी विनंतीही केलेली नाही म्हणून सदर तक्रारी विचारात घेणे अयोग्य आहे व त्या फेटाळणे उचित होईल. कक्षाचे आदेशानंतर वारंवार भेटून महावितरणचे अधिकाऱ्यांना तोंडी विचारणा केली असता अधिकाऱ्यांनी वीजपुरवठा करु असे आश्वासन दिल्याने मंचाकडे तक्रार केली नाही असा तोंडी खुलासा ग्राहकाने केल्यामुळे, महावितरण कंपनीने आपल्या स्तरावर वीज

कनेक्शन देणे बाबतची उचीत  कार्यवाही त्यांनी मान्य केलेल्या विहीत मुदतीत करणे योग्य ठरणार आहे.

वरील सर्व विवेचनाअंती मंच खालीलप्रमाणे आदेश  देत आहे.

# आदेश

**१) ग्राहकाने मंचाकडे दिलेले दि. १५.१२.२०१५ चे दोन्हीही अर्ज मुदतबाहय असून फेटाळण्यात येत आहे. व सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**२) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून  ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र  विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**श्री .वि.रा. कांबळे**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री ज.पु.बिवलकर**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक    :- ०३.०२.२०१६**
**ठिकाण   :- रत्नागिरी.**